# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### पनवेल (जि.रायगड) ग्रामीण व शहरी भागात पान टपरी व दुकानात गुटख्याची होत असलेली विक्री

**(१) ३२६४९ (१२-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पनवेल (जि.रायगड) ग्रामीण व शहरी भागात तंबाखूजन्य पदार्थ तसेच गुटख्यावर बंदी केली असताना पान टपरी व दुकानात गुटखा विकला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी गुटखा बंदीची अंमलबजावणीची दुर्लक्ष करणाऱ्या तसेच १०० टक्के गुटखा बंदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०८-०८-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) अन्न व औषध प्रशासनाने दि.२६.१०.२०२१ रोजी मे. झिया सुपर मार्ट पान शॉप, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील पेढीची तपासणी करून प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केला. तसेच पेढी मालक/विक्रेता यांचे विरुध्द खारघर पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड विधानातील कलमानुसार प्रथम खबरी अहवाल दाखल करून मा. सत्र न्यायालय, पनवेल येथे खटला क्रमांक ४१५/२०२१, दि. ११.११.२०२१ रोजी दाखल केला आहे.

पनवेल शहर व ग्रामीण कार्यक्षेत्रात अन्न व औषध प्रशासनामार्फत प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या अनुषंगाने जप्ती/धाडी टाकण्यात आल्या असून प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त करून संबंधितांविरुध्द प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड येथे नशेच्या गोळयांची विक्री होत असल्याबाबत

**(२) ३२८८२ (१२-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील औसा रस्त्यावरील काश्मिर पान स्टॉलवर धाड टाकली असता स्लेपरझ-०.५ नावाच्या नशेच्या ६०० गोळयांचा साठा आढळून आला असल्याचे दिनांक ०३ ऑक्टोबर,२०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२४-०८-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

सदरहू घटना नांदेड येथील नसून लातूर शहरात घडलेली आहे. विवेकानंद चौक, पोलीस स्टेशन, लातूर व अन्न व औषध प्रशासनाने संयुक्तपणे कारवाई करून काश्मिर पान स्टॉल, औसा रोड, लातूर येथून स्लेपरझ- ०.५ नावाच्या नशेच्या गोळ्या जप्त केल्या आहेत.

(२) विवेकानंद चौक, पोलीस स्टेशन, लातूर येथे संबंधित दोन आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० अन्वये प्रथम खबरी अहवाल क्र. ०६३९, दि. ०२.१०.२०२१ रोजी दाखल करून आरोपींना अटक केली आहे. तसेच पोलीसांनी संबंधित आरोपींविरुध्द मा. न्यायालयात चार्जशीट दाखल केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मधात साखरेची भेसळ होत असल्याबाबत**

**(३) ३३०८६ (१२-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाने विभागाने दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास केलेल्या तपासणीत पतंजली,डाबर, झेंडू, बैद्यनाथ, सफोला, उत्तराखंड या ब्रँडच्या मधात साखरेची भेसळ आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,साखरेची भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२४-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मध या अन्न पदार्थात साखर किंवा तत्सम अन्नपदार्थांची भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत नियमितपणे मधाचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतले जात असून विश्लेषणानंतर असुरक्षित घोषित केल्या जाणा-या अन्न पदार्थांच्या नमुन्याप्रकरणी मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रक्तपेढयांच्या तक्रारीबाबत**

**(४) ३३८२९ (१२-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना काळात २३४ रक्त पेढयांच्या विरुध्द तक्रारी आल्यामुळे त्यांचे विरुध्द नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२४-०८-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) माहे एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२१ या कोरोना कालावधीत एकुण १३ रक्त केंद्रांच्या विरुद्ध तक्रारी प्राप्त झाल्या

होत्या. त्यापैकी नऊ रक्त केंद्रांच्या विरुद्ध कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली. त्यापैकी दोन रक्त केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले व सात रक्त केंद्राचे परवाने निलंबित करण्यात आले. सदर तिनही रक्त केंद्राने शासनाकडे अपलि केले असून शासनाने निलंबन/रद्द आदेशास स्थगिती दिली आहे.

तीन रक्त केंद्र संबंधात प्राप्त तक्रारींची चौकशी केली असता त्यात तथ्य आढळून आले नाही.

एक रक्त केंद्राबाबत अतिरिक्त शुल्क आकारल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यामुळे चौकशी करून अहवाल सहायक संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**सोलापूर शहर आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जुना तुळजापूर नाका येथे गुटखा जप्त केल्याबाबत**

**(५) ३५९२१ (१२-०१-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहर आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जुना तुळजापूर नाका येथे एक ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये बनावट विषारी एक कोटी ३८ लाख रुपयांचा गुटखा जप्त करून पाच जणांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधितांविरुध्द अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०८-०८-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर शहर आयुक्तालयातील पोलीसांनी एकूण रु. १,०५,०५,२६०/- चा प्रतिबंधित अन्नपदार्थ साठा जप्त केला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) गुन्हे शाखा कार्यालय, जेल रोड पोलीस स्टेशन, सोलापूर यांनी अन्न व औषध प्रशासनास कळविल्यानुसार अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी व संबंधित पोलीस स्टेशनचे अधिकारी/कर्मचारी यांनी पोलीस स्टेशन आवारात उभ्या असलेल्या वाहनाची तपासणी केली असता, गाडीमध्ये गुटख्याची पाकीटे आढळून आली. अन्न व औषध प्रशासनाने गुटख्याची पाकीटांचे नमुने विश्लेषणासाठी घेवून उर्वरीत साठा जप्त करून नष्ट केला. तसेच प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहन जप्त करून जोडभावी पेठ, पोलीस स्टेशन, सोलापूर यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदर प्रकरणातील वाहन चालक व इतर एक साथीदाराविरुध्द अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ व भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलमानुसार जोडभावी पेठ, पोलीस स्टेशन, सोलापूर येथे फिर्याद क्र. ५२/२०२०, दि. ०१.०२.२०२० दाखल केली आहे. सध्यस्थितीत सदर प्रकरणी मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सोलापूर येथे १२ आरोपींविरुध्द खटला दाखल करण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गुटख्यावर बंदी असतांनाही (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथे अवैध मार्गाने विक्री केली जात असल्याबाबत**

**(६) ४३८३९ (०४-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटख्यावर बंदी असतांनाही (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथे अवैध मार्गाने विक्री केली जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकला जाणारा खर्रा हा बनावटी व भेसळयुक्त तंबाखू टाकून तयार करण्यात येत आहे हे, ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२४-०८-२०२३) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) अन्न व औषध प्रशासनाच्या यवतमाळ कार्यालयाने ता. महागांव, जि. यवतमाळ येथे दि. ०१.०४.२०२१ ते दि. ३१.०३.२०२२ या कालावधीत गुटखा व पानमसाला इत्यादी प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या अनुषंगाने एकूण ४ कारवाया केल्या असून सदर ठिकाणी आढळलेला प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच सर्व संबंधितांविरुध्द पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहे.

अन्न व औषध प्रशासनाने अमरावती विभागात दि. ०१.०४.२०२१ ते दि. ३१.०३.२०२२ या कालावधीत गुटखा व पानमसाला इत्यादी प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या अनुषंगाने एकूण १७५ कारवाया केल्या असून सदर ठिकाणी आढळलेला प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच संबंधितांविरुध्द पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून मा. न्यायालयात एकूण १६३ खटले दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील औषध दुकानांत अन्न पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(७) ४४०३५ (०९-०४-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील औषध दुकानांत अन्न पदार्थांची विक्री होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरात औषध दुकानातून रात्री अकरा नंतर अन्न पदार्थांची विक्री सुरु असल्याचे निदर्शनास येत असून औषध दुकानांना फक्त औषध विक्री करण्याची परवानगी असतांना नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२४-०८-२०२३) :**(१) व (२) हे खरे नाही.

पुणे शहरातील काही औषध दुकानांमध्ये कोल्ड्रींग्ज, आईस्क्रीमची विक्री होत असल्याची बातमी दि. ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशित झाली होती.

ज्या औषध विक्री परवानाधारकांकडे अन्न पदार्थ विक्री परवानासुध्दा आहे, त्या औषध विक्री परवानाधारकाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही औषध विक्री परवानाधारकांकाडून अन्न पदार्थांची विक्री करण्यात येऊ नये, अशा सूचना अन्न व औषध प्रशासनाकडून देण्यात आलेल्या आहेत.
(३) यासंदर्भात हेल्थ फस्ट मेडीको, लोणी काळभोर या औषध विक्रेत्याची तपासणी करण्यात आली असून त्यांच्याकडे FSSAI अंतर्गत नोंदणी दाखला उपलब्ध नव्हता. मात्र FSSAI च्या संगणकीय प्रणालीनुसार संस्थेस नोंदणी क्रमांक असल्याचे आढळून आले. तपासणीमध्ये विक्रेत्याने औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम १९४५ अंतर्गत नियम ६५ चे उल्लंघन केले असल्यामुळे त्यास नोटीस बजावण्यात आली असून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहरातील खाद्य व्यावसायिक विनापरवाना व्यवसाय करीत असल्याबाबत

**(८) ४४८६४ (१७-०९-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व जिल्ह्यात खाद्य व्यावसायिक विनापरवाना व्यवसाय करत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, महालेखापाल यांनी शासनास सादर केलेल्या अहवालात राज्यात १६.८६ लाख खाद्य व्यावसायिकांपैकी फक्त ९.४३ लाख खाद्य व्यावसायिकांनी माहे जून, २०१६ पर्यंत नोंदणी केली असून उर्वरित ७.४३ लाख खाद्य व्यावसायीक नोंदणी व परवानगी शिवाय व्यवसाय करीत असल्याचे नमूद केले आहे हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू अहवालात खाद्य व्यवसायिकांच्या कागदपत्रांची पडताळणी न करताच त्यांना परवाने देण्यात आल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार विना परवाना व्यवसाय करणाऱ्या खाद्य व्यावसायिक व कागदपत्रांची पडताळणी न करता परवाने देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१३-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुणे जिल्ह्यात माहे मे, २०२२ मध्ये एकूण १३८ अन्न आस्थापनांची तपासणी केली असून ८ विना नोंदणी/परवाना अन्न व्यवसाय करीत असलेल्या आस्थापना आढळून आल्या.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) याप्रकरणी शासनाने चौकशी केली असून अन्न व औषध प्रशासनातर्फे खाद्य व्यावसायिकांच्या कागदपत्रांची पडताळणी न करताच त्यांना परवाने देण्यात येत नाहीत. त्यामुळे अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गुहागर- विजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६- या महामार्गावरील R.C.C. गटाराचे काम पूर्ण करण्याबाबत

**(९) ४४९४७ (२०-०९-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर- विजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६-ई वरील जत शहरातील एक कि.मी. लांबीमध्ये कॉक्रिट रस्ता व गटारा पर्यंत पेव्हिंग ब्लॉकच्या बाजूपट्टीचे काम माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणच्या २० मीटर लांबीतील गटाराचे काम वगळता ९८० मीटर लांबीतील गटाराचे काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथे असलेल्या कबरीवरचे अतिक्रमण काढण्यात आलेले असून तेथील गटाराचे काम प्रलंबित असल्याने ते किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर गटाराचे काम पूर्णच्या दृष्टीने केल्या आहेत व शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०७-२०२३) :** (१) होय.

(२) ९८० मी. तसेच उर्वरित २० मी. असे एकूण १ कि.मी.चे काम पूर्ण झाले आहे.

(३) कबरचे अतिक्रमण काढून गटरचे काम पुर्ण झाले आहे.

(४) काम पूर्ण झाले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पिरंगुट, भोर (ता.मुळशी, जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये नागरिक सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(१०) ४५९४३ (२३-०९-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिरंगुट, भोर (ता.मुळशी, जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक स्थानिक तसेच इतर राज्यामधील नागरिक वास्तव्यास असल्याने येथे व्यावसायिक खोल्या भाडयाने देणे, रहिवास सदनिका विक्री, जागा भाडयाने देणे तसेच हॉटेल व इतर छोटे मोठे व्यावसायिक रहिवासी मोठया प्रमाणात असुन त्यांना अद्यापही बहुतांशी सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव शासनाच्या क्रिटीकल इन्फ्रास्ट्रक्चर निधीमधुन रस्ते, ड्रेनेज, स्ट्रीट लाईटची कामे मंजूर करावीत अशी मागणी नागरिकांतून होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२५-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

राज्यातील औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मीती व विकास योजनेंतर्गत मौजे-पिरंगुट, ता. मुळशी, जिल्हा-पुणे येथील औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी, रस्ते व स्ट्रीट लाईटची कामे इत्यादी प्रकल्पांना शासनाच्या क्रिटीकल इन्फ्रास्ट्रक्चर निधीमधून, निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी मा. मंत्री (उद्योग) यांना दिनांक १८/०४/२०२२ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. त्याअनुषंगाने उद्योग संचालनालय, मुंबई व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंबई यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

महाराष्टाचे औद्योगिक धोरण -२०१३ हे शासनाच्या दिनांक २२/०२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आले असून सदर शासन निर्णयान्वये राज्याच्या औद्योगिक क्षेत्रात ठराविक पायाभूत सुविधा देण्यासाठी राज्य शासनाकडून एक क्रिटिकल औद्योगिक पायाभूत सुविधा निधी स्थापन करण्यात आला आहे. राज्याच्या औद्योगिक विकासाला चालनासाठी औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास करण्याकरिता प्रतिवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीचा वापर व वाटपाची कार्यपध्दती शासनाच्या दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली असून सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक २०/१२/२०१६ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.
सदर शासन निर्णयानुसार -

• औद्योगिक विकासाच्या ध्येयपूर्ती साठी राबविण्यात येणारे अग्रेसर पथदर्शक प्रकल्प.

• औद्योगिक विकासाशी थेट संबंध असणाऱ्या व विकासाला पूरक असणाऱ्या आणि औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी हाती घेतलेले औद्योगिक पायाभूत सुविधा निर्मीती व विकासाचे प्रकल्प.

• उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी नियोजित/हाती घेतलेले व राज्य शासनाला खात्री झालेले महत्वाचे प्रकल्प जसे ऊर्जा व रस्त्याचे जाळे इत्यादी.

• राज्यातील औद्योगिक विकासासाठी सामायिक सुविधा उपलब्ध करुन देणारे औद्योगिक पायाभूत सुविधा निर्मीती व विकासाचे प्रकल्प.

• राज्यातील औद्योगिक गुणवत्ता वाढीसाठी चाचणी व प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या संस्थाव्दारे घेण्यात येणारे प्रकल्प.

• राज्यातील औद्योगिक वाढीस उत्तेजन देणारे विस्तृत प्रकल्प अहवाल / प्रकल्पासाठीचे व्यवहार्यता अहवाल / परिसंवाद/ कार्यशाळा/ परिषदा/ प्रशिक्षणे/ प्रदर्शने यांचा समावेश असलेलेल व निर्यात वाढीशी संबंध असलेले अधीसूचित उपक्रम

वि.स. १९२ (7)

• शासनाच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या वार्षिक योजनेत किंवा सार्वजनिक उपक्रमांच्या भांडवली अर्थसंकल्पांमध्ये समाविष्ट नसलेले प्रकल्प

• सार्वजनिक उपक्रमांच्या हद्दी बाहेरील २ कि.मी. लांबीचे रस्ते व २ कि.मी. लांबीच्या पाणी पुरवठा व जलवाहिन्यांचे प्रकल्प इत्यादी.

(२) सदर औद्योगिक संस्था / समूहाकडून दिनांक २५/०२/२०१४ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या प्राप्त प्रकल्पांना मंजूरी देण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली “महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सुविधा विकास समिती” अशी सुकाणू समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचे मा. मुख्य सचिव हे सक्षम प्राधिकारी आहेत.

(३) व (४) मौजे पिरंगुट, भोर (ता.मुळशी , जि.पुणे ) येथील औद्योगिक वसाहतीकरिता आवश्यक पायाभूत सोयी सुविधांकरिताचा प्रकल्प प्रस्ताव, योजनेचे विहीत निकष पूर्ण करीत असल्यास, संबंधित संस्थेने अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव अभिकरण यंत्रणेच्या शिफारशीसह उद्योग संचालनालयास सादर केल्यास व सदर प्रस्तावाला सुकाणू समितीची मान्यता प्राप्त झाल्यास, पायाभूत सुविधांची निर्मीती व विकास या योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

---

**वरिष्ठ व निवड वेतन श्रेणीसाठीची बंद असलेली ऑनलाईन प्रशिक्षण संगणक प्रणाली सुरु करण्याबाबत**

**(११) ४५९७३ (१७-०९-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ व निवड वेतन श्रेणीसाठीची बंद पडलेली ऑनलाईन प्रशिक्षण संगणक प्रणाली दिनांक १ जून,२०२२ रोजी पासून अद्यापही सुरू झाली नसल्याने राज्यातील नोंदणी केलेले सुमारे ९४ हजार शिक्षक या प्रशिक्षणापासून वंचित राहिल्याचे माहे जून,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत विभागाच्या बेजबाबदार कार्यपद्धतीमुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशिक्षणाबाबत विविध शिक्षक संघटनांसह प्रशिक्षणार्थी शिक्षक वर्गातून आता ऑनलाइन ऐवजी ऑफलाइन (प्रत्यक्ष) प्रशिक्षण नसेल तर संबंधीत पात्र शिक्षकांना वरिष्ठ व निवड श्रेणी लागू करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२१-०७-२०२३) : (१)**हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही

(४) शासन निर्णय क्र. शिप्रधो २०१२/ प्र.क्र. ४३ / प्रशिक्षण, दि.२०.०७.२०२१ या शासन निर्णयान्वये शिक्षकांच्या वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन ऑनलाईन स्वरूपामध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या कार्यालयामार्फत करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. वरिष्ठ व निवडश्रेणी करीता आवश्यक प्रशिक्षणाच्या स्वरूपामध्ये कालानुरूप व सुसंगत बदल करणे आवश्यक असल्यामुळे उक्त नमूद शासन निर्णयान्वये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत वरिष्ठ व निवड श्रेणीच्या प्रशिक्षणाचे स्वरूप व अभ्यासक्रम नव्याने निश्चित करून ही प्रशिक्षणे कालानुरूप सुसंगत पद्धतीने घेण्याचे निश्चित केले आहे.

याप्रमाणे प्रशिक्षण गटनिहाय प्रशिक्षण अभ्यासक्रम विकसित करून त्याचे ई- कोर्स मध्ये रुपांतर करण्यात आले व ऑनलाईन प्रशिक्षण प्रणालीच्या माध्यमातून दिनांक १ जून २०२२ पासून सदरचे वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले आहे. यानुसार सदरच्या प्रशिक्षणास नावनोंदणी केलेल्या सर्व व्यवस्थापनाच्या शिक्षकांसाठी हे प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले होते. या ऑनलाईन प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणासाठी नावनोंदणी केलेल्या एकूण ९४,५४२ शिक्षकांचे

प्रशिक्षण सुरू झाले तसेच सदरचे प्रशिक्षण हे सर्व पात्र व नोंदणीकृत प्रशिक्षणार्थी यांना दिनांक ३१ मे २०२३ पर्यंत पूर्ण करणेसाठी अंतिम मुदत ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र या कार्यालयामार्फत देण्यात आलेली होती. या संदर्भीय मुदतीनुसार सर्व नोंदणी केलेल्या शिक्षकांनी आपले प्रशिक्षण विहित मुदतीमध्ये पूर्ण केलेले आहे.

तसेच ऑनलाईन प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थी हे आपल्या सोयीच्या वेळी व सोयीच्या ठिकाणावरून सदरचे प्रशिक्षण पूर्ण करू शकत आहे. याचबरोबर सदरचे प्रशिक्षण पूर्ण करणेसाठी संबंधित शिक्षकास एकूण ४५ दिवसांचा कालावधी दिलेला असल्याने सदरचे प्रशिक्षण पूर्ण करण्याचा ताण देखील संबंधित शिक्षकवर येत नाही. तसेच शिक्षकांच्या शालेय वेळापत्रकावर देखील सदरच्या प्रशिक्षणाचा कोणताही परिणाम होताना दिसत नाही. यानुसार सदरच्या प्रशिक्षणाबाबत संबंधित प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे चांगले अभिप्राय त्यांनी सदरच्या प्रशिक्षण प्रणालीमध्ये नोंदविले आहेत.

यामुळे सदरचे प्रशिक्षण ऑनलाईन स्वरूपामध्ये सदरच्या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून अत्यंत सुरळीतपणे व शिक्षकांसाठी आनंददायी वातावरणामध्ये पूर्ण केले असल्याने सदरचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड ( जि.रायगड, ता. कर्जत) येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) ४६२५० (१७-०९-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड (जि.रायगड, ता. कर्जत) येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शासनाकडून वाटप करण्यात येत असलेल्या शालेय गणवेशात शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन कर्जत पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिका-यांनी गैरव्यवहार केल्याचे माहे मे,२०२२ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आरोप कागदोपत्री पुराव्यासह विद्यार्थी संघटनेकडून केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय त्यानूसार भ्रष्टाचार करणाऱ्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२१-०८-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यासाठी गटविकास अधिकारी, कर्जत यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय चौकशी समिती गठित करण्यात आली होती. संबंधित गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कर्जत यांची प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच, संबंधित सर्व केंद्र प्रमुख तसेच, सर्व शाळांचे मुख्याध्यापक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हया रुग्णालयासमोरील श्री.जी मेडीकलमधून कटल ब्लेडची अवैधरित्या विक्री होत असल्याबाबत

**(१३) ५०२४७ (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोळयांच्या शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या कटल ब्लेडची किंमत ६० रूपये असतांना चंद्रपूर जिल्हा सामान्य रूग्णालयासमोर असलेल्या श्री जी मेडिकलमधून सदर ब्लेड सहाशे रुपयांना विकली जात असल्याची तक्रार अन्न व औषध प्रशासन विभागाकडे करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

वि.स. १९२ (9)

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदूनुसार जादा दराने कटल ब्लेडची अवैध विक्री करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०३-०८-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने विषयांकित पेढीची तपासणी करण्यात आली असून कटल ब्लेडच्या पुरवठा संबंधित विक्रेत्यांने केल्याचे आढळून आले. मात्र, तपासणीवेळी विक्रेत्यापेढीकडे कटल ब्लेडचे खरेदी बिले व विक्री बिले उपलब्ध नव्हती. कटल ब्लेडची खरेदी विना बिलाने करून विक्री विना बिलाने करत असल्यामुळे औषधे व सौदर्यं प्रसाधने नियमांचे उल्लंघन केल्यामुळे सदर पेढीचे औषध विक्री परवाने सहायक आयुक्त, चंद्रपूर यांनी दिनांक ०३.११.२०२२ रोजीच्या आदेशान्वये दि. ०५.१२.२०२२ पासून रद्द करण्यात आले होते. सदर प्रकरणी नियमानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**युनिलिव्हरच्या डव सहित नेक्सस, सुआवे, ट्रेसम्मे आणि टिगी या जगविख्यात ब्रँड्सच्या शाम्पूमध्ये कर्करोग होण्यास कारणीभूत ठरणारे घटक आढळून आल्याबाबत**

**(१४) ५०६४३ (१८-०१-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युनिलिव्हरच्या डव सहित नेक्सस, सुआवे, ट्रेसम्मे आणि टिगी या जगविख्यात ब्रँड्सच्या शॅम्पूमध्ये रक्ताचा कर्करोग होण्यास कारणीभूत ठरणारे बेंझेन, प्रोपेन व बुटान हे घटक आढळून आल्याबाबतची माहिती दिनांक २६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास अन्न व औषध प्रशासानच्या संकेतस्थळावर निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मुंबईसह सर्वत्र अद्यापही सदर उत्पादनाची विक्री सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उत्पादनाची बाजारात विक्री रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०३-०८-२०२३) : (**१) हे खरे नाही.

अशी बातमी अन्न व औषध प्रशासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द झाली नसून सदरची बातमी USFDA च्या संकेतस्थळावर "Unilever issues voluntary U.S. recall of select dry shampoos due to potential presence of Benzene" या शिर्षकाखाली प्रकाशित झाली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदरहू सौंदर्य प्रसाधनांचे उत्पादन अमेरिका येथील मे. युनिलिव्हर करत असून त्याचे वितरण भारतामध्ये होत नाही. तथापि, सदर सौंदर्य प्रसाधने ऑनलाईन पोर्टलवर विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सदरहू सौदर्य प्रसाधनांचे वितरण मे. महावीर मार्केटींग दापोडे, भिवंडी येथून होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे तेथील साठा प्रतिबंधित करण्यात आला आहे. तसेच, सदरहू सौंदर्य प्रसाधनांचे नमुने विश्लेषणार्थ अन्न व औषध, प्रयोगशाळा, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ व मराठवाड्यातील मध्यम, लघु व शुक्ष्म उद्योगाबाबत**

**(१५) ५०९६९ (१८-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व मराठवाड्यात सन २०१५ ते २०२१ या सहा वर्षाच्या कालावधीमध्ये मध्यम, लघु व सुक्ष्म उद्योगांच्या आधार नोंदणीपैकी केवळ ११% उद्योग नोंदणी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तज्ञ समितीची नियुक्ती करून विदर्भ व मराठवाड्यातील औद्योगिक मागासलेपणाचा अनुशेष निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०३-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

विदर्भातील नागपूर व अमरावती विभागामध्ये सन २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंत २,६१,३२४ उद्योग घटकांची उद्योग आधार नोंदणी झालेली असून सन २०२०-२१ मध्ये १,६८,५२७ इतकी उद्यम नोंदणी झालेली आहे.

मराठवाड्यात सन २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंत १,३२,७४८ इतकी उद्योग आधार नोंदणी झाली असून सन २०२०-२१ मध्ये १,२७,१९३ इतकी उद्यम नोंदणी झालेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात परदेशातील मुदतबाह्य सौंदर्य प्रसाधनांची विक्री होत असल्याबाबत**

**(१६) ५१४८० (१८-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परदेशातील मुदतबाह्य सौंदर्य प्रसाधने आयात करुन त्यांची विक्री होत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांना भुरळ घालणाऱ्या नामांकीत कंपन्यांच्या सौंदर्य प्रसाधनांच्या विक्रीतून ग्राहकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुदतबाह्य सौंदर्य प्रसाधनांच्या वापरामुळे ग्राहकांवर विपरीत परिणाम होत असल्याने याबाबत शासनाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०८-०८-२०२३) :**(१) अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

यासंदर्भात, औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियमानुसार सौंदर्य प्रसाधने नियमित तपासणी करण्यात येत असून सौंदर्य प्रसाधनांचे नमुने चाचणी व विश्लेषणासाठी घेण्यात येतात.

वि.स. १९२ (11)

मुंबई येथील डोंगरी व बृहन्मुंबई विभागातील मुलुंड या भागात टाकलेल्या धाडीमध्ये सौदर्य प्रसाधनांचा साठा जप्त करण्यात आला असून त्यावर कायद्यातील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम विभागाने (ता.महागांव, जि.यवतमाळ) वृक्ष लागवडीतील जिवंत झाडांची माहिती संकलित केल्याबाबत**

**(१७) ५१५५५ (२३-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाने लाखो रुपये खर्च करुन (ता.महागांव, जि.यवतमाळ) करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीतील जिवंत झाडांची माहिती माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान संकलित करण्याची सुरुवात करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील माहिती संकलित करुन शासनाकडे सादर करण्यात आली आहे काय, तसेच सदरहू माहितीमध्ये काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, या प्रकरणावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२९-०८-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर माहिती संकेतस्थळावर भरण्यात आली असून नोव्हेंबर २०२२ अखेर एकूण लागवड केलेल्या ३३,५०० झाडांपैकी २७,१८९ झाडे जिवंत असल्याचे आढळून आले आहे.

(३) लागवड केलेल्यापैकी कमी झालेल्या झाडांकरीता देयकाच्या रकमेमधुन १० % रक्कम अनामत म्हणून ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर औद्योगिक (जि.नाशिक) क्षेत्र मौजे मुसळगांव व गुळवंच येथील प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंड देणेबाबत**

**(१८) ५३३६५ (१८-०१-२०२३). ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) नाशिक जिल्हयातील सिन्नर औद्योगिक क्षेत्र मौजे मुसळगाव व गुळवंच येथील प्रकल्पग्रस्तांना (PAP) एमआयडीसीने केलेल्या करारनाम्यानुसार विकसित भूखंड दिलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना विकसित भूखंड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०७-२०२३) :** (१) व (२) अंशत : खरे आहे.

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर औद्योगिक क्षेत्रात (सेझ अंतर्गत) भूसंपादन झालेल्या व ताब्यात आलेल्या ११८५.७२ हे.आर. क्षेत्राच्या भूंसपादना अंतर्गत ४८२ इतके प्रकल्पग्रस्त आहेत. सदर ४८२ प्रकल्पग्रस्तांना एकूण १७७.३९ हे.आर. इतके क्षेत्र आवश्यक आहे. आजपावेतो २०३ प्रकल्पग्रस्तांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तत्कालीन धोरणानुसार ६५.१७ हे.आर. क्षेत्राचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित २७९ प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप करणेसाठी एकूण ११२.८८ हे.आर. क्षेत्र भूखंडासाठी व रस्त्याचे आरेखन, खुली जागा, सुविधा क्षेत्र असे एकूण १२७.४९ हे.आर. क्षेत्राची आवश्यकता आहे. सदर क्षेत्र उपलब्ध झाल्यानंतर भूखंड वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. १९२ (12)

**अंबाजोगाई, जि. बीड. येथे पंचतारांकित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) मंजूर करणेबाबत**

**(१९) ५३४९६ (१८-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई, जि.बीड येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अंतर्गत औद्योगिक क्षेत्र प्रकल्प नाही. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई येथे जिल्हास्तरीय सर्व कार्यालय असून या ठिकाणी साखर कारखाना, सुत गिरण्या, कृषी उत्पादनावर आधारित उद्योग, सहकारी बँका, पतसंस्था, आरोग्य संस्था, नावजलेल्या शैक्षणिक संस्था, असल्यामुळे शहराचा विकास झपाट्याने वाढत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लातूर येथील विमानतळ जवळ असून परळी, घाटनांदूर, लातूर, येथील रेल्वे स्टेशनही जवळ असल्याने औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूकदारांच्या दृष्टीने अंबाजोगाई हे शहर सोयीचे असून शहरालगत मोठ्या प्रमाणावर गायरान, मोकळ्या जागा उपलब्ध असल्यामुळे या ठिकाणी पंचतारांकित MIDC साठीचा प्रस्ताव करून मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी उद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांचेमार्फत अंबाजोगाई शहरालगत १० ते १५ कि.मी. च्या परिघामध्ये शासकीय जमिन उपलब्धतेबाबत तसेच खाजगी जमिन संपादन करणे शक्य असल्याबाबत माहिती उपलब्ध करुन देण्याची विनंती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत दि. २५/७/२०२२ व दि.१२/१/२०२३ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, बीड यांचा जमीन उपलब्धते बाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर म.औ.वि. अधिनियमानुसार व उद्योजकांच्या मागणीनुसार अंबाजोगाई शहरामध्ये MIDC ची स्थापना करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याबाबत**

**(२०) ५४०१४ (१८-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तंत्रनिकेतन मधील पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी सोलापूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदवीचे शिक्षण घेण्यासाठी सोयीचे व्हावे म्हणून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. उच्च तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक २५ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने सोलापूर शहरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१७-०७-२०२३) :**(१) व (२) होय.

(३) मा.स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांना दि.०६.०१.२०२० च्या विनंती अर्जान्वये शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर येथील पदविका अभ्यासक्रम श्रेणीवर्धनाने बंद न करता नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय सुरु करण्याबाबत विनंती केली होती.

त्यानुसार संचालक, तंत्र शिक्षण यांनी दि.२३.१२.२०२० च्या पत्रान्वये सोलापूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि, सदर प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झाली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नरडाणा एम.आय.डी.सी.ता.शिंदखेडा जि.धुळे येथे उदयोग उभारणेबाबत

**(२१) ५४१२३ (१८-०१-२०२३). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरडाणा एम.आय.डी.सी.मधील टप्पा क्र. १ व टप्पा क्र.२ मध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करून त्या उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी प्लॉट वाटप करण्यात आले असून मागील २० वर्ष उलटूनही बऱ्याच उद्योजकांनी अदयाप उद्योग उभारले नसल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

नरडाणा औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. १ मध्ये आरेखित ७ भूखंडाचे वाटप करण्यात आले असून, नरडाणा औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ मध्ये ५६१ पैकी ३७२ भूखंड वाटप करण्यात आले असून उर्वरित भूखंड प्राधान्य/ निविदा/ ऑनलाईन पध्दतीने वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

(२) ज्या भूखंडाचा विकास कालावधी संपलेला आहे व उद्योग सुरू नसलेल्या भूखंडांना नोटीस देऊन भूखंड मऔवि महामंडळाच्या नियमानुसार ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### एफएसएसएआय या कायदयाची अंमलबजावणी सुरु झाल्याने या कायदयाअंतर्गत सुट्टे तेलावर बंदी घालण्याबाबत

**(२२) ५४८५१ (१८-०१-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २०११ साली एफएसएसएआय या कायदयाची अंमलबजावणी सुरु झाल्याने सदर कायदयाअंतर्गत सुट्टया तेलावर बंदी घालण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच केंद्र शासनाने जुने डब्बे वापरावर बंदी घातली असून राज्य शासनाने प्लास्टिक उत्पादनावर बंदी घातल्याने राज्यातील खेडोपाडी व झोपडपट्टीत राहणाऱ्या रोजंदारीवर जगणाऱ्यांना सुट्टे तेल घेणे शक्य नसल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

अखिल भारतील खाद्यतेल व्यापारी महासंघ, ठाणे यांनी राज्यातील खेडोपाडी व झोपडपट्टीत राहणाऱ्या रोजंदारीवर जगणाऱ्यांना सुट्टे तेल घेणे शक्य नसल्याने शासनाने सुटे तेल विक्री करण्यास सूट देण्याबाबत दि. २७.१०.२०२२ रोजीच्या निवेदनाद्वारे विनंती केली होती.

(३)  अन्न सुरक्षा व मानके (विक्रीवरील निर्बंध आणि प्रतिबंध) विनियम २०११ च्या विनियम २.३.१५ (१)(बी) मधील परंतुकास राज्य शासन लोकहितार्थ, शासकीय राजपत्रात त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून अन्न सुरक्षा व मानके अधिनियम मधील नमूद तरतुदीमधून कोणत्याही खाद्यतेलाची सुट्या स्वरुपात विक्री करण्यास सूट देऊ शकतील अशी तरतूद नमूद केली आहे. यापूर्वी दि. २८.१०.२०१३, दि. २८.०१.२०१६, दि. २१.०४.२०१७ व दि. २८.०८.२०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे राज्यामध्ये सहा महिने ते एक वर्षाच्या कालावधीकरिता कोणत्याही खाद्य तेलाच्या सुट्या स्वरुपातील विक्री करण्यास सूट देण्यात आली होती. सद्यस्थितीत खाद्यतेलाच्या सुट्या स्वरुपाच्या विक्रीस सूट देण्यात आलेली नाही.

(४)  प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज, जि. बीड. येथे MIDC मंजूर करणे बाबत.

**(२३)  ५५०९४ (१९-०१-२०२३).  श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)  केज, जि. बीड येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अंतर्गत औद्योगिक क्षेत्र नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)  नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२)  सदर ठिकाणी औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याबाबत मौजे उमरी, ता. केज, जिल्हा बीड येथील सरकारी गट नंबर ४३ व ५४ ची पाहणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत करण्यात आली आहे. गट नंबर ४३ मधील अतिक्रमण विरहीत ३५.० हे. आर व गट नंबर ५४ मधील असलेले शेतकऱ्यांचे अतिक्रमण महसूल विभगाने काढून दिल्यास साधारणत: १७.५० हे. आर  असे एकूण ५२.५० हे. आर. क्षेत्र औद्योगिक क्षेत्रासाठी उपलब्ध होऊ शकते.   सदर क्षेत्रापासून केज हे तालुक्याचे ठिकाण ७ किमी अंतरावर व बीड हे जिल्हयाचे ठिकाण ५८ किमी अंतरावर आहे. तसेच प्रस्तावित क्षेत्रालगत १५ मीटर रुंदीचा डांबरी रस्ता उपलब्ध आहे.प्रस्तावित क्षेत्रापासुन जाधवजवळा डॅम हा २ किमी अंतरावर असल्यामुळे सदर क्षेत्रास पाणी पुरवठा होऊ शकतो. प्रस्तावित क्षेत्रास पाण्याच्या उपलब्धतेबाबत  मऔवि महामंडळाच्या अभियांत्रिकी विभागाने कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, परळी यांना दिनांक १६.१०.२०१८ च्या पत्रान्वये अहवाल पाठविण्याबाबत कळविले आहे. तथापी सदर अहवाल अद्याप मऔवि महामंडळास अप्राप्त आहे.

उपरोक्त प्राथमिक पहाणी अहवालामध्ये नमूद क्षेत्राच्या उपलब्धतेबाबत जिल्हाधिकारी बीड यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.  जिल्हाधिकारी बीड यांचा अहवाल  प्राप्त झाल्यानंतर मऔवि महामंडळाचे  भू-निवड समितीमार्फत प्रस्तावित क्षेत्राची पहाणी करुन म.औ.वि अधिनियमानुसार औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्याबाबत  पुढील उचित कार्यवाही करण्याची तजवीज मऔवि महामंडळाने ठेवली आहे.

(३)  प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर एम.आय.डी.सी. बाबत

**(२४)  ५५१६८ (१८-०१-२०२३).  श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर एम.आय.डी.सी. भागात भूखंडासाठी सन २०१९ पासून  १६ उद्योजकांची प्रतीक्षा यादी बाकी असतानाही त्यांना डावलून नामांकित अभिनेता व त्यांची पत्नी यांच्या देश अग्रो प्रा.लि. या कंपनीला तत्परतेने प्लॉट देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंपनीचे भांडवल हे साडे सात कोटी रुपये इतके असताना त्या कंपनीने एम.आय.डी.सी.कडे पंधरा कोटी अठ्ठावीस लाख रुपयांची रक्कम भूखंडासाठी भरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

अति. लातूर औद्योगिक क्षेत्रात भूखंड वाटपाकरीता Online Land Allotment System व्दारे भूखंड वाटपाचे धोरण आहे. सदर ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्जदारांमार्फत त्यांचे पसंतीचा भूखंड व लागणारे क्षेत्र नमूद करुन भूखंड वाटपाकरिता ऑनलाईन अर्ज केले जातात. सदर अर्जाची मऔवि महामंडळाच्या प्रचलित धोरण/ नियमानुसार छाननी करुन छाननीअंती मऔवि महामंडळाच्या सर्व निकषांची पूर्तता करणाऱ्या पात्र अर्जदारांना भूखंड वाटप समितीच्या बैठकीत अर्जदारांचे उद्योगाकरिता आवश्यक क्षेत्र भूखंडाच्या/ जागेच्या उपलब्धतेनुसार मंजूर करण्यात येते.

मे. देश ॲग्रो प्रा.लि. यांचे भूखंड मागणी अर्जावर तसेच त्यांचे अर्जापूर्वी प्राप्त १५ ऑनलाईन अर्जांवर उपरोक्त नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करुन कार्यवाही करणेत आली आहे.

मे. देश ॲग्रो प्रा.लि. यांचे अर्जांपूर्वी प्राप्त १५ अर्जदारांपैकी ८ अर्जदारांना भूखंड वाटप समितीच्या बैठकीत भूखंड मंजूर करण्यात आला असून, ६ अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत व १ अर्ज Defer (पुढे ढकलणे) करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे आहे.

मे. देश ॲग्रो प्रा.लि. यांचे कंपनीच्या Master Data नुसार भरणा केलेले भांडवल हे रु. ७,५०,००,०००/- इतके आहे. परंतू, सदर कंपनीने रु. ५५० प्रति चौमी दराने त्यांना वाटप केलेल्या २,५२,७२६ चौमी क्षेत्रासाठी १५,२८,९९,३००/- इतकी रक्कम मऔवि महामंडळास भरणा केलेली आहे.

(३) व ४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) शहापूर-धेरंड हद्दीत इंडोनेशियातील सिनारमन्स प्रकल्पाच्या उभारणीबाबत

**(२५) ५५३६१ (१८-०१-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर-धेरंड (ता.अलिबाग,जि.रायगड) हद्दीतील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी एमआयडीसीच्या ताब्यात दिल्यानंतर आजमितीस २० वर्षांचा कालावधी उलटून गेला तरीही सदर जागेवर एकाही नामांकित कंपनीचा प्रकल्प उभारता आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चीन मधील नाइन ड्रगन्स पेपर्स या कंपनीमध्ये करार केल्याप्रमाणे शहापूर धेरंड येथे नाइन ड्रगन्सचा प्रकल्प उभारण्यात येणार होता परंतू पाच वर्षांत साडेचार हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार होती व या प्रकल्पामुळे १० हजार कोकणवासियांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचेही निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उद्योग उभारणीमुळे भारतात प्रथमच तसेच राज्यातील वीस हजार कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक करुन प्रकल्प उभारणीमुळे याचा कोकणवासियांना रोजगारासाठी उपयोग होणार असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या उभारणीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पासाठी यापूर्वीच ४०० एकर जमिन देण्यात आली असून प्रकल्पाच्या मागणीनुसार अधिकची जागा देण्यासाठी शासन विचाराधिन आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १९२ (16)

**श्री. उदय सामंत (२४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

शहापूर-धेरंड (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील सुमारे ९०० हेक्टर जागा Asia Pulp and Paper (APP Sinarmass) या इंडोनेशियन कंपनीला देणे प्रस्तावित असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी ३०० हेक्टर जागेचे देकारपत्र देण्यात आले आहे. याशिवाय शहापूर- धेरंड येथील २५० एकर जागा मे. युपीएल या खत निर्मिती कंपनीला वाटपासाठी प्रस्तावित असून जागा आरक्षणाचे कंम्फर्ट लेटर कंपनीला देण्यात आले.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

मे. नाईन ड्रॅगन पेपर्स होल्डिंग या कंपनीशी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि. ०२ मार्च, २०२१ रोजी सामंजस्य करार केला होता. त्यानुसार कंपनीने शहापूर-धेरंड येथे १ अब्ज डॉलर्स (तत्कालीन विनिमय दराने सुमारे रू. ६५०० कोटी) इतकी गुंतवणूक करण्याचे मान्य केले होते. त्यापैकी ६२५ दशलक्ष डॉलर्स (तत्कालीन विनिमय दराने सुमारे रू. ४००० कोटी) इतक्या रक्कमेची गुंतवणूक कंपनी पहिल्या टप्प्यात करणार होती व त्यातून सुमारे ३००० लोकांना रोजगार उपलब्ध होणार होता.

(४) हे खरे नाही.

मे. नाइन ड्रगन्स कंपनीसमवेत केलेल्या सामंजस्य कराराची अंमलबजावणी करता आली नाही. त्यामुळे, कंपनीला जागा वाटप करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना नवीन औद्योगिक धोरण, २०१९ च्या सामुहिक प्रोत्साहन योजनेतील प्रोत्साहन लागू न केल्याबाबत

**(२६) ५६५३८ (२४-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना नवीन औद्योगिक धोरण, २०१९ च्या सामुहिक प्रोत्साहन योजनेतील प्रोत्साहन लागू न करण्याचा निर्णय ऊर्जा विभाग पत्र क्र.मंउस-२०२०/प्र.क्र.८/उद्योग-८, दिनांक ९ जून, २०२० नुसार मंत्रीमंडळ उप समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याचा विपरीत परिणाम हा सहकारी साखर कारखान्यांच्या प्रस्तावित प्रकल्पांवर होईल याची शासनास माहिती आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी नवीन प्रकल्प निर्माण करण्यासाठी या सामुहिक प्रोत्साहन योजनेचा लाभ मिळावा अशी मागणी देखील महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादित संघाने माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२५-०७-२०२३) :** (१) होय,

सहकारी साखर कारखान्यांना शासनाचे भागभांडवल व सबसिडी प्राप्त होत असल्याने सामूहिक प्रोत्साहन योजना - २०१९ अंतर्गत येणारी प्रोत्साहने देवू नयेत असा निर्णय मा. मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि. १७ मार्च, २०२० रोजीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त दि.०९ जून, २०२० रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(२) (३), (४) व (५)

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रोत्साहने देय करणेबाबतची निवेदने लोकप्रतिनिधींकडून शासनास प्राप्त झाली आहेत. सहकारी तत्वावर स्थापित झालेल्या सहकारी साखर कारखान्यांना सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रोत्साहने लागू करण्याबाबत निर्णय घेण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

### उल्हासनगर शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे आठ लाखाचा तंबाखूजन्य गुटखा जप्त केले बाबत

**(२७) ५६६०८ (२४-०४-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे आठ लाख रुपयांचा तंबाखूजन्य गुटखा विठ्ठलवाडी पोलिसांनी जप्त केल्याचे दिनांक ०५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात आरोपींना अटक करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०३-०८-२०२३) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

विठ्ठलवाडी, उल्हासनगर-४, पोलीस ठाणे व अन्न व औषध प्रशासन, ठाणे यांनी संयुक्तिकरित्या दिनांक ०३.०१.२०२३ रोजी बराक नं. १६८३ जवळ, कॅनरा बँकेचा पाठीमागे, सेक्शन-२५, उल्हासनगर-४ येथील रुम मध्ये प्रतिबंधित अन्नपदार्थाबाबत कार्यवाही करून एकूण रुपये ७,८८,१५२/- इतक्या किमतीचा साठा जप्त केला आहे. तसेच, संबंधित दोन आरोपींना अटक करून त्यांचेविरुध्द प्रथम खबरी अहवाल क्रमांक ०२/२०२३, दिनांक ०३.०१.२०२३ रोजी दाखल केला आहे.

मध्यवर्ती पोलिस स्टेशन, उल्हासनगर-३ पोलीस ठाणे यांनी दिनांक ०३.०१.२०२३ रोजी मे. किशन किराणा स्टोअर्स, जुने भाजी मार्केट, खटरमल चौक, स्टेशन रोड, उल्हासनगर-३ या ठिकाणी प्रतिबंधित अन्न पदार्थाबाबत कार्यवाही करून एकूण रुपये १९,३१५/- इतक्या किमतीचा साठा जप्त केला आहे. तसेच, संबंधित तीन आरोपींना अटक करून त्यांचेविरुध्द प्रथम खबरी अहवाल क्रमांक ०७/२०२३, दिनांक ०४.०१.२०२३ रोजी दाखल केला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### मौजे सुपा तालुका पारनेर येथे सुपा एमआयडीसी येथे अग्निशमन केंद्रास मंजुरी मिळून बंब उपलब्ध करणे बाबत

**(२८) ५७४८५ (२४-०४-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील सुपा एमआयडीसी विस्तारीकरण माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान झपाट्याने वाढत असल्याने तसेच तेथे छोट्या-मोठ्या नामांकित कंपन्या प्रस्थापित असल्याने अपघात किंवा आग लागल्यास शिरूर किंवा अहमदनगर येथून अग्निशमनचे बंब मागावावे लागतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे अंतर हे ३५ ते ४० किलोमीटर असल्यामुळे सुपा एम.आय.डी.सी. ठिकाणी अग्निशमन केंद्रास मंजुरी देऊन सदर ठिकाणीच बंब उपलब्ध केले जावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुपा एम.आय.डी.सी. ठिकाणी अग्निशमन केंद्रास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०७-२०२३) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

(३) सुपा-पारनेर औद्योगिक क्षेत्रात अग्निशमन केंद्राकरीता ए.एम-१९ हा भूखंड राखीव ठेवण्यात आला आहे. अग्निशमन केंद्र बांधण्यासाठीच्या प्रशासकीय मान्यतेचा प्रस्तावास मंजूरी देऊन अग्निशमन केंद्राचे बांधकाम लवकरच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरु करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्जुना (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) नदीवरील पाचल-तळवडे पूल धोकादायक झाल्याबाबत

**(२९) ५७७०७ (२५-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुना (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) नदीवरील पाचल-तळवडे पूल दळणवळणासाठी धोकादायक झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुलै, २०२१ मध्ये अर्जुना नदीवर आलेल्या महापुरानंतर पाचल-तळवडे येथे नवीन पुलाची उभारणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने चार कोटी रुपयांचा आराखडा तयार करुन शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आराखड्यासाठी शासनाने अद्याप मंजूरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) सदर पूल हा बुडीत प्रकारचा असून माहे जुलै २०२१ मध्ये महापूरादरम्यान मोठया प्रमाणात सदर पूलावरुन पाणी जाऊन पूल नादुरस्त झाला होता. त्यानंतर तात्काळ पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येऊन सद्य:स्थितीत पुल सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

तथापि, या पूलाच्या पुर्नबांधणीचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर पोलिसांनी दुधात भेसळ करणारी टोळी पकडल्याबाबत

**(३०) ५७९७३ (२४-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर पोलिसांनी दुधात भेसळ करणाऱ्या टोळीला पकडल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यानस निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पंढरपूर पोलिसांनी रितसर गुन्हा नोंदवून पुढील तपास केल्याचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२४-०८-२०२३) :** (१) ग्रामीण पोलिस स्टेशन, पंढरपुर यांनी दि.१६.०१.२०२३ रोजी ३ इसमांना दुधात भेसळ करणाऱ्या रसायनांसह ताब्यात घेतले आहे.

(२) नाही. शासनास अहवाल प्राप्त नसला तरी अन्न व औषध प्रशासनाकडून सदर प्रकरणी दि.१६.०१.२०२३ रोजी १) निलेश बाळासाहेब भुईटे, (पुरवठादार व विक्रेता यांचा मध्यस्ती) २) परमेश्वर सिध्देश्वर काळे, मालक मे. श्री स्वामी समर्थ दुध संकलन केंद्र, ३) गणेश हणुमंत गाडेकर, वाहन चालक व ४) समीर सुभाष मेहता (पुरवठादार) यांच्याविरुध्द अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील व भा. दं. वि. कलम मधील कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(३) दूध भेसळीवर आळा घालण्यासाठी शासनाकडून अन्न व औषध प्रशासनामार्फत नियमितपणे, दूध भेसळ करणाऱ्यावर पाळत ठेवून किरकोळ विक्रेत्यांपासून ते उत्पादकापर्यंत सर्व दूध व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांच्या तपासण्या करून विश्लेषणासाठी दुधाचे नमुने घेण्यात येतात.

वि.स. १९२ (19)

दुधाच्या पिशव्या टॅम्परिंग करून होणाऱ्या भेसळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवून संबंधित व्यक्ती विरुध्द पोलीसात गुन्हे नोंदविले जातात.

शहरांमध्ये येणारे दूध मानकाप्रमाणे आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी विशेष मोहीम (नाका मोहीम) राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनची स्थापना करणेबाबत**

**(३१) ५८४४२ (२४-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) : तारांकित प्रश्न क्रमांक ४२०५३ ला दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २ जुलै, २००३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रसाधने प्रकाशन समितीअंतर्गत घेण्यात असून दिनांक ३० जून, २००७ रोजी मुंबई येथील चरित्रसाधने समितीच्या बैठकीत तत्कालीन समितीचे अध्यक्ष व तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन स्थापन करण्याचे आश्वासित केले होते हे खरे आहे काय ,

(२) असल्यास,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अप्रकाशित साहित्य खंडरूपाने प्रकाशित व्हावे या साठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीला व्यापक रूप देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनची नितांत आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनची स्थापना करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०७-२०२३) :** (१) व (२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीच्या दि. ३०जून, २००७ च्या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनची घटना तयार करण्याबाबत निर्देश दिले होते. मात्र, त्यानंतर याबाबत कार्यवाही झालेली नाही. दरम्यान सदर समितीची वेळोवेळी पुर्नगठन झाले असून सध्या शासन निर्णय दि. ३०.०३.२०२१, दि. २२.०६.२०२१, दि. १५.११.२०२१ व दि. २१.०१२.२०२१ नुसार गठीत समिती कार्यरत आहे. या समिती मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यांचे/ ग्रंथांचे प्रकाशन करण्याचे कार्य व्यवस्थितपणे सुरु असल्याने सद्य: स्थितीत त्याकरिता स्वतंत्र फाऊंडेशन स्थापन करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुहागर-विजापूर (ता.पलसु,जि.सांगली) महामार्गाचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(३२) ५९०८५ (२५-०४-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर-विजापूर (ता.पलसु,जि.सांगली) महामार्गाचे काम गत ७ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची प्रलंबित कामे व ऐकेरी वाहतुक यामुळे या महामार्गावरील अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १९२ (20)

**श्री. रविंद्र चव्हाण (१८-०७-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

कराड तासगाव प्रकल्पाची (ता.पलूस, जि.सांगली) एकूण १७.८० कि.मी. लांबी आहे. सदर लांबीपैकी १२.६२ कि.मी. काँक्रिट रस्ता व १.६० कि.मी. डांबरी रस्ता अशी एकूण १४.२२ कि.मी. लांबीचे काम पुर्ण झाले आहे.उर्वरीत काम प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैभववाडी-गगनबावडा (जि.सिंधुदुर्ग) मार्गावरील करुळ-जामदारवाडी रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(३३) ५९४०१ (२५-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी-गगनबावडा (जि.सिंधुदुर्ग) मार्गावरील करुळ-जामदारवाडी रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाच्या कामास ग्रामस्थांनी विरोध केला असून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदाराचे काम बंद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणारे ठेकेदार व त्याला पाठिशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

वैभववाडी गगनबावडा मार्गावरील करुळ जामदारवाडी येथील रस्त्याचे काम राष्ट्रीय महामार्गाचे मानक व निकषानुसार करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

देखभाल दुरुस्ती कामामध्ये डांबर व खडीने खड्डे भरण्याचे काम प्रगतीत असताना या कामामध्ये कार्पेट सिलकोट/विअरींग थर ची तरतुद नसल्यामुळे ग्रामस्थांचा गैरसमज होवून त्यांनी विरोध केला होता. या महामार्गाची दुपदरी कॉक्रिटीकरणाने दर्जोन्नती करण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असुन काम हाती घेण्याची पुढील कार्यवाही प्रगतीत आहे, ही माहिती ग्रामस्थांना देण्यात आली व त्यानंतर गैरसमज दूर झाल्यामुळे सदर कामास ग्रामस्थांनी विरोध केला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंदुजा समुहाने महाराष्ट्रात विविध क्षेत्रामध्ये करार केल्ाबाबत

**(३४) ५९७२४ (२४-०४-२०२३). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदुजा समुहाने महाराष्ट्रात विविध क्षेत्रामध्ये सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा दिनांक १५ डिसेंबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास करार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुंतवणूकीमुळे राज्यातील किती तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे,

(३) असल्यास, सदर गुं्तवणूक कोणकोणत्या क्षेत्रात करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, गुंतवणुक होऊन तरुणांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२५-०७-२०२३) :** (१) (२) व (३) होय

हिंदुजा समुहाने महाराष्ट्रातील रिन्युएबल एनर्जी, मिडीया ॲण्ड एंटरटेनमेंट, ग्रामीण आर्थिक विकास, सायबर सिक्युरीटी, न्यू जेन कमर्शियल ऑटोमोबाईल्स ॲण्ड सोल्यूशन्स, BFSI, हेल्थकेअर, पायाभूत सुविधा, रियल इस्टेट,शिक्षण क्षेत्र, न्यु एज टेक्नॉलॉजी, मॅन्युफॅक्चरींग या सारख्या क्षेत्रांमध्ये सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी करार केला असून सदर गुंतवणूकीनंतर राज्यातील तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय महामार्ग ६१ मधिल माजलगाव (जि.बीड) येथील बायपास रस्त्याचे अपूर्ण काम पुर्ण करणेबाबत..

**(३५) ६००३१ (२५-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) येथील राष्ट्रीय महामार्ग ६१ च्या बायपास रस्त्याचे अपूर्ण काम पुर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, औरंगाबाद यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०७-२०२३) :** (१) होय.

(२) माजलगाव (जि.बीड) येथील राष्ट्रीय महामार्ग ६१ च्या बायपास रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. रस्ता सुस्थितीत असुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी मार्गाबाबत

**(३६) ६०१२९ (२५-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपुरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी मार्गासाठी भूसंपादीत जमीन ताब्यात मिळण्यास झालेला विलंब तसेच पुतळे, स्मारके व मंदीरे स्थंलातरीत करणे यामुळे या मार्गाचे काम गत एक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावरील प्रत्येक गावाच्या थांब्याच्या ठिकाणी भूमिगत रस्ते होणार असल्यामुळे शेतकऱ्यांची घरे, झाडे, गोठे तसेच पाईपलाईन इत्यादींचे नुकसान होणार असल्याने बाधित शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बाधित शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई देणे व सदर प्रकल्प लवकारात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०८-२०२३) : (**१) अंशत: खरे आहे.

पुणे जिल्हयातील संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी मार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अखत्यारीत येते.

पुणे जिल्हयातील संत ज्ञानेश्वर पालखी मार्गामध्ये काही ठिकाणी मंदिरे व तत्सम बाबी स्थलांतरीत करुन भूसंपादन करण्यासाठी थोडासा विलंब झाला आहे व तुकाराम पालखी मार्गाचे कामास भुसंपादनामुळे विलंब झालेला नसून काम प्रगतीपथावर आहे.

(२) संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गामधील बाधीत शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याच्या मागणीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केल्याची बाब खरी आहे व संत तुकाराम महाराज पालखी महामार्गासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींची अशा स्वरुपाची मागणी नाही.

(३) पुणे जिल्हयातील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गामध्ये ३ पॅकेजेस मध्ये काम हाती घेण्यात आले आहे. धर्मपुरी ते लोणंद या बाबीचे ५७ टक्के काम व लोणंद ते दिवेघाट लांबीचे २९.७० टक्के काम पुर्ण होवुन उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. दिवेघाट ते हडपसर या लांबीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन मंजुरीसाठी केंद्र शासनास सादर केलेला आहे. या मार्गामध्ये ज्या बाधीत शेतक-यांना मोबदल्याविषयी दर निश्चित करुन शासकीय नियमानुसार नुकसान भरपाई दिली जाते व शेतक-यांनी भूसंपादन व मोबदल्याविषयी काही शंका असल्यास त्याचे निराकरण केले जाते. संत तुकाराम महाराज पालखी मार्गाचे काम नियोजनानुसार प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हायब्रीड अन्युटी अंतर्गत दौंड (जि. पुणे) तालुक्यातील कामांना निधी मिळणेबाबत**

**(३७) ६०२६५ (२५-०४-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यातील कामांना हायब्रिड ॲन्युइटी टप्पा - २ अंतर्गत निधी मिळणेबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांचेकडे माहे जानेवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने निधी मिळणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२३) :** (१) होय , हे खरे आहे.

(२) हायब्रीड ॲन्युइटी टप्पा २ अंतर्गत हाती घ्यावायाच्या कामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतची कामे मार्च २०२३ च्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यामध्ये दौंड (जि.पुणे) तालुक्यातील तीन कामे समाविष्ट आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. १९२ (23)

**उरण (जि.रायगड) तालुक्यातील जवळपास ६४ गावातील शेतक-यांच्या जमिनींचे औद्योगिकरणाच्या नावाखाली संपादन करण्यात येणार असल्याबाबत**

**(३८) ६०३३५ (२५-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील ६४ गावातील शेतकऱ्यांच्या जमिनींचे औद्योगिकरणाच्या नावाखाली संपादन करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील औद्योगिकरणासाठी पुनाडे, वशेणी व सारडे या गावातील जमिन संपादनाची अधिसूचना ही जाहिर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिकरणासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करताना एमआयडीसी कडून पुनर्वसनाबाबत तसेच कोणकोणते उद्योग, प्रकल्प येणार याची स्पष्टता नसल्यामुळे शेतकरी संभ्रमात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त विभागात यापूर्वीही शासनाने विविध विकासकामांसाठी संपादित केलेल्या शेतक-यांच्या जमिनीचा योग्य मोबदला व योग्य ते पुनर्वसन न केल्यामुळे शेतक-यांनी एमआयडीसीच्या भूसंपादनाला विरोध केला असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून एमआयडीसी मार्फत औद्योगिकरणासाठी उरण तालुक्यातील शेतक-यांच्या जमिनींचे संपादन करताना आधी पुनर्वसन व नंतर विकास या धोरणाखाली कोणती तातडीने उपाययोजना व कार्यवाही केली आहे ,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०७-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

उरण (जि.रायगड) मध्ये मौजे सारडे, पुनाडे व वशेणी या गावातील जमिनीचे भूसंपादन pass through पध्दतीने करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या प्रकरण -६ अन्वये २९४.३९३३ हे.आर क्षेत्राची अधिसूचना दि.२७.१२.२०२२ रोजी निर्गमित केली आहे.

(३) हे खरे नाही.

मे.ब्ल्यू स्टार लिअल्टर्स लि.या कंपनी करीता उरण तालुक्यातील मौजे सारडे,पुनाडे व वशेणी येथील २९४.३९३३ हे.आर क्षेत्र प्रस्तावित लॉजिस्टिक पार्कसाठी विकसीत होणार असल्यामुळे सदरहू क्षेत्र संपादित करण्यातचे योजिले आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

प्रस्तावित प्रकल्पासाठी pass through पध्दतीने भूसंपादन करणेसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ व भूमी पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी नुकसान मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २६ ते ३० नुसार उच्चाधिकार समितीच्या मंजुरीनंतर मोबदला रक्कम निश्चित केली जाणार आहे.

प्रस्तावित प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचे संपादन करताना महामंडळाच्या पुनर्वसन व पुर्नबहाली -२०१९ च्या तरतुदीनुसार पुनर्वसन विषयक लाभ देय होणार आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शालेय पोषण आहार शिजवण्यासाठी काम करणाऱ्या मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३९) ६०४३३ (२५-०४-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १ ते ८ वी च्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेंतर्गत मध्यान्ह भोजन देणाऱ्या कामगारांना दररोज ५० रुपये प्रमाणे तुटपुंजे मानधन मिळत असल्याने सदरील कामगारांनी तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर

चतुर्थ श्रेणी दर्जा देण्याबाबत व मानधनात भरीव वाढ करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२१-०८-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
राज्यातील काही लोकप्रतिनिधी तसेच, स्वयंपाकी तथा मदतनीस संघटना, आयटक यांचे प्रस्तुत विषयाबाबतचे निवेदने शासनास प्राप्त झाले आहेत.
(२) प्रस्तुत योजनेंर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनासाठी केंद्र शासनाकडून रु.६००/- प्रति माह इतके मानधन देण्यात येते. सदर मानधनात वाढ करुन केंद्र व राज्य हिस्सा मिळून रु.२५००/- इतके मानधन माहे एप्रिल-२०२३ पासून अदा करण्याचा शासन निर्णय दि.०९ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील मोकाट जनावरांमुळे होत असलेले अपघात

**(४०) ६०९५१ (२५-०४-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील महालक्ष्मी मंदिर ते मेंढवन खिंड या परिसरात मोकाट जरावरांमुळे अपघातांच्या संख्येत वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खर आहे काय,
(२) असल्यास, टोल कंपनी याबाबत तातडीने सुरक्षेच्यादृष्टीने उपाययोजना करणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०७-२०२३) : (१)** मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील महालक्ष्मी मंदिर ते मेंढवन खिंड हा महामार्ग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.
पोलिस अहवालानुसार जानेवारी २०२३ ते आजपावेतो सदर महामार्गावर मोकाट जनावरांमुळे होणा-या अपघातांची संख्या निरंक आहे.
(२) सदर बाब टोल कंपनीच्या अखत्यारीत येत नसुन या महामार्गावर प्राधिकरणामार्फत प्राणी व वाहनांना महामार्ग ओलांडण्यासाठी ठिकठिकाणी भूयारी मार्ग दिलेले आहेत व ते वापरात आहेत.
मोकाट जनावरांमुळे अपघात होऊ नये यासाठी सदर महामार्गावर २४ तास पेट्रोलींग करीता एक वाहन गस्त घालत असुन रोडवर मोकाट जनावर रस्त्याच्या बाजूला हाकलुन लावण्यात येतात, महामार्गावरील डीव्हायडरवर गवत खाण्यासाठी जनावरे येऊ नयेत याकरीता वेळोवेळी गवत कापुन काढले जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बासमती तांदळातील भेसळ रोखण्यासाठी अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने तांदूळ कंपन्यांसाठी नविन नियमावली कार्यान्वित करण्याबाबत

**(४१) ६१२९२ (२५-०४-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बासमती तांदळातील भेसळ रोखण्यासाठी अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने तांदूळ कंपन्यांसाठी नविन नियमावली शासनाने नुकतीच जाहिर केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नियमावलीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, त्यांची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२४-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा अधिनियम २००६ नियम व नियमन २०११ मधील अन्न सुरक्षा व मानके (अन्न उत्पादने व अन्न अपमिश्रके)[Food Products and Food Additives Regulations] नियमन २०११ च्या नियमन २.४.६ मधील खंड २६ नुसार बासमती तांदूळ या अन्न पदार्थासाठीची मानके निश्चित करून त्याचा समावेश सदर नियमनामध्ये करण्यासाठी दि. ११ जानेवारी २०२३ रोजी अधिसूचना राजपत्रामध्ये (Gazette Notification) प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर नियमनांमध्ये (Regulation) बासमती तांदूळाचे १) Brown Basmati Rice (De-Husked) २) Milled Basmati Rice ३) Paraboiled brown (De-husked) Basmati rice (Brown Basmati rice of paraboiled paddy) व ४) Milled Paraboiled Basmati Rice असे एकुण ४ प्रकार करून त्यांची मानके निश्चित करण्यात आली आहेत.
(३) सदर नियमनाची (Regulation) अंमलबजावणी दि.०१ ऑगस्ट २०२३ पासुन संपूर्ण देशभरात करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदूर्ग-कोल्हापूर रस्त्याच्या काँक्रिटीकरण व दुपदरीकरणाच्या कामाच्या सद्यस्थितीबाबत

**(४२) ६१४८२ (२५-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग-कोल्हापूर २१ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरण व दुपदरीकरणाच्या कामाला शासनाने माहे नोव्हेंबर, २०२२ च्या अखेर रुपये २४९ कोटीला मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या काँक्रिटीकरण व दुपदरीकरणाच्या कामाची सद्यस्थिती काय आहे तसेच सदर काम केव्हापर्यंत पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२६-०७-२०२३) :** (१) होय.
(२) कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कंत्राटदारास माहे जून २३ मध्ये निविदा स्विकृती पत्र देण्यात आले आहे. कामाचे कार्यारंभ देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीत असून १८ महिन्याच्या कामाचा कालावधीनुसार माहे मे २०२५ पर्यंत काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानोरा (जि.अमरावती) तालुक्यातील अति दुर्गम भागातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४३) ६१५७१ (२५-०४-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानोरा (जि.वाशीम) तालुक्यातील अति दुर्गम भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी नागरिकांनी केली असूनही सदर मागणीकडे सबंधित प्रशासन व विभागाकडून टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागातंर्गत मानोरा तालुक्यातील रस्ते वेळोवेळी दुरुस्त करुन वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात येतात.

(४) कोणत्याही विलंब झालेला नाही.

---

**जळगांव जिल्हयातील अन्न व औषध प्रशासनातर्फे अहवालाबाबत**

**(४४) ६१६१४ (२५-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील अन्न व औषध प्रशासनातर्फे ज्या दुकानांमधून तपासणीसाठी नमुना गोळा केले असतात ते १४ दिवसात अन्न व औषध प्रशासनातील अन्न विश्लेषक यांनी देणे बंधनकारक असते यानंतर सदर अहवालानुसार १० दिवसानंतर सहाय्यक आयुक्त यांनी संबंधित नमुनाधारक दुकानदारांना योग्य त्या कारवाईचा अहवाल कळविणे बंधनकारक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तीन महिने होऊनही संबंधित जळगांव अन्न विश्लेषक यांनी याबाबतचा अहवाल प्रलंबित ठेवला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी व त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवाल दिरंगाईने जाणिवपूर्वक देण्यात येत असून जे निर्दोष असतील त्यांना भेसळयुक्तधारक असा अहवाल देण्यात असल्याने यात होत असलेल्या गैरप्रकारांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी योग्य कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०३-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न सुरक्षा व मानके कायदयांतर्गत विश्लेषणासाठी घेतलेल्या अन्न नमुन्यांचा विश्लेषण अहवाल अन्न विश्लेषक यांनी १४ दिवसात देणे बंधनकारक असल्याबाबतची तरतूद अन्न सुरक्षा व मानके कायद्यात आहे. तथापि, सदर अहवालानुसार सहायक आयुक्त यांनी संबंधित नमुनाधारक दुकानदारांना सदरचा अहवाल १० दिवसात किंवा किती दिवसात कळवावा याबाबत अन्न सुरक्षा व मानके कायदयात तरतूद करण्यात आलेली नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) खरे नाही.

(४) अन्न विश्लेषक, जळगांव यांच्याकडून जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, जळगाव येथे अन्न नमुने विश्लेषणासाठी पाठविले जात असतात. जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, जळगाव या प्रयोगशाळेची दरमहा २० अन्न नमुने विश्लेषण करण्याची क्षमता आहे. तथापि, त्यांच्याकडे क्षमतेपेक्षा जास्त अन्न नमुने (दरमहा सरासरी १००) विश्लेषणासाठी प्राप्त होत असतात. यास्तव, अन्न नमुने व त्या प्रमाणामध्ये कर्मचारी मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे अन्न चाचणी अहवाल विहीत कालावधीत देणे शक्य होत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरात आयटी पार्क उभारणेबाबत

**(४५) ६१६७६ (१५-०६-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहर हे ऐतिहासिक व भौगोलिक आर्थिकदृष्ट्या संपन्न शहर आहे तसेच या शहरास छत्रपती शाहू महाराजांचा वारसा लाभला असून सदर ठिकाणी आयटी पार्कची अत्यंत आवश्यकता असल्याने स्थानिक अभियंते, उद्योजक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी यासाठी शासनाकडे अनेकदा मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दखल घेऊन कोल्हापूर शहरात शेंडा पार्कच्या जागेवर आयटी पार्क साकारण्याचा शासनाचा प्रस्ताव असल्याचे पालकमंत्री,कोल्हापूर जिल्हा यांनी दिनांक २५-११-२०२२ रोजी वा त्या सुमारास जाहिर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोल्हापूर येथे आयटी पार्क उभारणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. उदय सामंत (२५-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), व (३)

राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ यास मा.मंत्री मंडळाच्या दि.३०.०५.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ हे दि.२७.०६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आले आहे.

सदर धोरणात राज्याच्या सर्वभागात माहिती तंत्रज्ञान उद्याने तसेच माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक विकसित होण्याच्या अनुषंगाने विविध सवलती/ प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

सदर धोरणातील निकषानुसार कोल्हापूरसह राज्यातील कोणत्याही भागातील खाजगी विकासकाने माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसित करण्यासाठी किमान २०००० चौ.फूट बांधीव क्षेत्रासाठी मंजूरी घेऊन आयटी पार्क विकसित करण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राकडे सादर केल्यास आयटी पार्क विकसित करण्याकरीता आवश्यक असणारी मंजूरी व इरादापत्र देण्याबाबतची कार्यवाही उद्योग संचालनालयामार्फत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड दक्षिण विभागातील नाबार्ड योजने अंतर्गत रस्त्यांची व पुलांची कामे करण्याबाबत

**(४६) ६२१३४ (२५-०४-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड दक्षिण विभागातील नाबार्ड योजने अंतर्गत रस्त्यांची व पुलांची कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने रस्त्यांच्या व पुलांच्या कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०८-२०२३) :** (१) हो, हे खरे आहे.

(२) निधीची उपलब्धता विचारात घेता, विषयांकित काम हे प्राधान्यक्रम,मंजूरी, निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. १९२ (28)

**खालापुर तालुक्यातील ( जि.रायगड ) शेतक-यांच्या जमिनीगॅस वाहिनीकरिता २५० शेतक-यांच जमिनी संपादित केल्या परंतु त्यांना अदयाप जमिनीचा मोबदला दिला नसल्याने शेकडो शेतक-यांनी माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण**

**(४७) ६२२९० (२६-०४-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापुर तालुक्यातील ( जि.रायगड ) शेतक-यांच्या जमिनी रिलायन्स कंपनीनी गॅस वाहिनीकरिता संपादित केल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिलायन्स कंपनीनी गॅस वाहिनीकरिता २५० शेतक-यांच जमिनी संपादित केल्या परंतु त्यांना अदयाप जमिनीचा मोबदला दिला नसल्याने शेकडो शेतक-यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासदंर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(४) त्यानुसार यास जबाबदार असणा-या कंपनीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) तसेच शेतक-यांना जमिनीचा मोबदला तात्काळ देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,त्याची कारणे काय आहेत,

**श्री. उदय सामंत (२५-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी सादर केलेल्या तक्रारीतील मुद्दे रिलायन्स ईथेन पाईपलाईन लि. या संपादन संस्थेशी निगडीत आहेत. उपोषणकर्त्यांच्या तक्रारींचे निराकरण करुन त्यांना बेमुदत उपोषणापासून परावृत्त करणेबाबत संपादन संस्थेस जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने संपादन संस्थेने अहवाल जिल्हाधिकारी, रायगड यांना सादर केला आहे.

या प्रकरणी उपोषणकर्ते व अर्जदार यांच्या मागण्या / समस्यांच्या अनुषंगाने व प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समितीच्या पदाधिकारी यांच्या विनंतीस अनुसरुन शासन स्तरावर बैठक आयोजित करण्याची विनंती जिल्हाधिकारी रायगड यांनी दिनांक २५ जानेवारी, २०२३ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन,नवी मुंबई यांना केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) व (६) रिलायन्स ईथेन गॅस पाईपलाईन करीता संपादित केलेल्या जमिनींचे मालक / प्रकल्पग्रस्त / स्थानिक यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी दिनांक २८ नोव्हेबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक आयोजित करण्यात आली होती.

तसेच प्रकल्पग्रस्त जमीन मालकांना जमीनीची नुकसानभरपाई देण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री ( उद्योग ) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ जुलै, २०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत "सदरहू जमीनीची नुकसानभरपाई संबंधित जमीन मालकांना सत्वर अदा करणे" चे निदेश मा.मंत्री ( उद्योग ) यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिले आहेत.

---

**नाशिक जिल्हयातील सिन्नर मुसळगाव येथील सहकारी औद्योगिक वसाहती क्षेत्रासाठी अग्निशमक सुविधा नसल्याबाबत**

**(४८) ६२७९० (२६-०४-२०२३). ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील सिन्नर मुसळगाव येथील सहकारी औद्योगिक वसाहती क्षेत्रासाठी अग्निशमक सुविधा नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुसळगाव औद्योगिक वसाहतीमधील साईटेक फार्मास्युटिकल कंपनीला माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान आग लागल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अग्निशमक सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

वि.स. १९२ (29)

(४) असल्यास, उपरोक्त ठिकाणी अग्निशमक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) होय, हे ही खरे आहे.

(४) स्वतंत्र अग्निशमन व्यवस्था उभारणी करून त्याची कायमस्वरूपी देखभाल करणे हे सिन्नर तालुका सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित, सिन्नर, जिल्हा नाशिक या संस्थेस परवडणारे नसल्याने या संस्थेकडून अग्निशमन व्यवस्था उभारणी करण्याचा कोणताही प्रस्ताव/ निवेदन प्राप्त झालेला नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. दरम्यान आग लागल्याच्या दुर्घटनेची माहिती प्राप्त झाली तर नजीकच्या सिन्नर नगरपरिषद, सिन्नर तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माळेगांव(सिन्नर) क्षेत्रातून अग्निशमन सेवा उपलब्ध करून घेण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील गोरेगाव (पूर्व) येथे आरे कॉलनी युनिट क्रमांक २ मध्ये धान्याचा काळा बाजार होत असल्याबाबत

**(४९) ६३३१८ (०४-०५-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव पूर्व येथे आरे कॉलनी युनिट क्रमांक २ मध्ये शिधा वाटप करण्यासाठी आणलेल्या धान्याचा काळाबाजार होत असल्याने पोलिसांनी धाड टाकून करोडो रुपयांचा साठा जप्त केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्या, या अनधिकृतरित्या पशू व दुग्ध विकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या गोदामात अवैधरित्या धान्याचा साठा करुन अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासकीय महसूल (भाडे) बुडवून सदर धान्याचा काळा बाजार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संबंधित व्यक्तींवर मागील दोन वर्षात कोणतीच कारवाई झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून धान्याचा काळा बाजार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (११-०८-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) वरीष्ठ पोलिस निरिक्षक, आरे पोलिस ठाणे यांच्याकडून दि.१८.१२.२०२१ रोजी गुन्हा क्र.वि.स्था. गु.र.क्र.६९/२०२१ अन्वये

१) जीवनावश्यक वस्तू कायदा- १९५५, कलम ३,७,८

२) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेड्युल्ड कमॉडिटीज (रेग्युलेशन अँड डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर १९८६ चे कलम ३, ६ व ८ चा भंग

३) दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमॉडिटीज लायसन्सिंग (द्वितीय) ऑर्डर, १९६६,

४) दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमॉडिटीज लायसन्सिंग (द्वितीय) (रेग्युलेशन अँड डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, १९६६

५) पी.डी.एस. ऑर्डर, २००१ व राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास वरीष्ठ पोलिस निरिक्षक, आरे पोलिस ठाणे यांच्यामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. १९२ (30)

**भिवंडीमध्ये मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क (MMLP) स्थापन करण्यास होत असलेला विलंब**

**(५०) ६३६७१ (२७-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात ८ (MMLPS) स्थापन करण्याची घोषणा केंद्रिय रस्ते व वाहतुक मंत्री यांच्यामार्फत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात नॅशनल हायवेज लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड, एमआयडीसी आणि रेल विकास निगम लिमिटेड यांच्यात दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लॉजिस्टिक्सला सपोर्ट करण्यासाठी भिवंडी हे सर्वात योग्य ठिकाण असल्याने येथे एक (MMLP) विकसित करण्याचा प्रस्ताव आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एक वर्षापूर्वी सामंजस्य करार होऊनही या (MMLP) बाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन प्रशासन व शासनामार्फत सदर प्रकल्प लवकरात लवकर होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबणाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०१-०८-२०२३) :** (१) भारतमाला योजनेंतर्गत देशात ३५ ठिकाणी Multi Model Logistic Corridor (MMLP) स्थापन करण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यापैकी ८ MMLP महाराष्ट्रात प्रस्तावित आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) MMLPस्थापन करणे तसेच MMLPसाठी ठिकाण निश्चीत करणेची कार्यवाही केंद्रीय रस्ते व वाहतुक मंत्रालयामार्फत करण्यात येते. दि.१७/१२/२०२१ रोजीच्या सामंजस्य करारानुसार (MoU)महाराष्ट्रात MMLPsस्थापन करणेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, नाशिक, औरंगाबाद व दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र (टप्पा क्रं.२) अशी संभाव्य ५ (पाच) ठिकाणे पहिल्या टप्प्यात निश्चित केलेली आहेत.

(४) व ५) दि. १७/१२/२०२१ रोजीच्या सामंजस्य करारात नमूद केलेली ठिकाणे व लोकप्रतिनिधीमार्फत MMLPsस्थापन करणेसाठी प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय रस्ते, परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाचे अधिकारी यांचेबरोबर संयुक्त बैठक दि.१८/०४/२०२३ रोजी आयोजीत केलेली होती. प्रस्तावित MMLPs साठी निश्चित केलेल्या जागांची पाहणी केंद्रिय रस्ते, परिहवन आणि राजमार्ग मंत्रालय तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून संयुक्तरित्या करण्यात येत आहे. प्रकल्पाची तांत्रिक व्यवहार्यता केंद्रीय रस्ते परिवहन आणि राजमार्ग विभागाकडून करण्यात येत असून भुसंपादन प्रक्रियेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करणेबाबत आवश्यक सुचना या बैठकीमध्ये देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने केंद्रिय रस्ते, परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या यांचे स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.